**नि.फौ.ख.क्र.१२१/२०२४**
सरकार — वि.- प्रकाश
**निशाणी क्र. १९**

**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.२ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव — विक्रम विश्वास मधे
वय — ३४ वर्षे, व्यवसाय — पो.ह. ब.नं.२०२, लोहमार्ग पोलीस स्टेशन, पुणे
सध्या रा. - कृष्णनगर पोलीस लाईन, पिंपरी, पुणे.

**<u>सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.काळे</u>**
**<u>यांचेमार्फत शपथेवर सुरु-</u>**

जानेवारी २०२४ मध्ये मी लोहमार्ग पोलीस स्टेशन पुणे येथे पोलीस शिपाई म्हणुन कार्यरत होतो. दि.०९/०१/२०२४ रोजी मी दिवसपाळी डयुटीवर होतो. त्यादिवशी गुन्हा क्र. ४४५/२०२३ कलम ३७९ भा.दं.वि या गुन्हयामध्ये ट्रेसींग प्राप्त झालेले इसम नामे प्रकाशकुमार मुखीया, वय — ३० वर्ष, राहणार - ताडीवाला रोड, पोलीस चौकी जवळ यास फोनव्दारे पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशन येथे बोलावुन घेतले. त्यावेळी पोलीस हवलदार कांबळे यांनी मोबाईलबददल विचारपुस केली असता सॅमसंग गॅलक्सी एम-१० हा मोबाईल पुणे रेल्वे स्टेशन येथे एका अनोळखी इसमाकडुन विकत घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. पोलीस हवलदार कांबळे यांनी आयएमईआय नंबरची खात्री करुन दोन पंचा समक्ष सदरचा मोबाईल जप्त केला. तसेच प्रकाश मुखीया यास भा.दं.वि कलम ४११ नुसार अटक केली. सदरचा मोबाईलमध्ये सीमकार्ड त्याचे बहीण नामे सिमादेवी हिचे नावे होते. सदरच्या प्रकरणाची कारवाई माझे समक्ष करण्यात आली होती. त्यानुसार माझा जबाब दि. ०९/०१/२०२४ रोजी श्री. कांबळे यांनी नोंदवला. आज रोजी सदरचा आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री.ए. टी. नावडकर यांच्यामार्फत सुरू-</u>**

२. ट्रेसींग या आरोपीचे नावे आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने आम्हाला सदर मोबाईल खरेदी केल्याची पावती देवु केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा मोबाईल चोरीचा होता हे

प्रस्तुतच्या आरोपीला माहिती नसल्याचे त्याने आम्हास सांगितले होते. तसेच सदरचा मोबाईल चोरीचा असता तर त्याने खरेदी केला नसता हे देखील त्याने आम्हास सांगितले होते.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

सा.वा.दा.ब.अ.क.के. समक्ष

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि.१९/०८/२०२५

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2025.08.19 16:56:08 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. १९/०८/२०२५